**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED JOURNAL, OCT-NOV 2018, VOL- 6/30*

# प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची गरज

**बापूसाहेब गणपत चौगुले[१] , Ph.D. & कु. माळी रुपाली बबनराव [२]**
*[१]अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे ४११००९*
*[२]टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे पीएच. डी. शिक्षणशास्त्र विभाग सन २०१८–१९*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

बौद्धिकदृष्ट्या उच्च दर्जा असणारे विद्यार्थी म्हणजे प्रज्ञावंत होय असे म्हणता येईल. प्रज्ञावंत आपल्या बौद्धिकतेच्या जोरावर आपले व्यक्तिमत्त्व सिद्ध करतात. ते एकाच बाबतीत नाहीतर सर्वच बाबींमध्ये अग्रेसर असतात.

टर्मनच्या मापन श्रेणीनुसार २०% विद्यार्थी हे बौद्धिकदृष्ट्या उच्च दर्जा असणारे असतात यांचा साधारण बुद्ध्यांक ११० पेक्षा जास्त असतोच, परंतु १३० पेक्षाही जास्त बुद्ध्यांक असणारे असे अतिप्रज्ञावंत किंवा कुशाग्र बुद्धिमत्ता लाभलेले विद्यार्थी असतात.

सर्वसाधारणपणे एकूण विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेच्या दर्जानुसार तीन गट दिसून येतात. यामध्ये

१) २०% विद्यार्थी– बौद्धिकदृष्ट्या सर्वसामान्यांपेक्षा उच्च दर्जा असलेले

२) ६०% विद्यार्थी – सर्वसामान्य बुद्धिमत्ता दर्जा असलेले

३) २०% विद्यार्थी – बौद्धिकदृष्ट्या सर्वसामान्यांपेक्षा कमी दर्जा असलेले

असे दिसून येतात.

जगाच्या पाठीवर कितीतरी उदाहरणे आहेत की त्यांना अलौकिक बुद्धिमत्ता लाभलेली आहे. त्यांना प्रज्ञावंत असे संबोधले जाते. उदा. ज्ञानेश्वरांनी १६ व्या वर्षी 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला. अमृतानुभव हा ग्रंथ तर त्यांच्या कुशाग्र बुद्धिचा विकास दाखवितो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची घटना लिहिली, चंद्रशेखर व्यंकट रमण यांनी १६ व्या वर्षीच बी.ए. प्रथम श्रेणीत पहिले येवून विज्ञानाचे सुवर्णपदक मिळविले. महात्मा गांधी सर्व जगाचे महात्मा म्हणून प्रसिद्ध झाले. अहिंसेच्या मार्गाने लढा देवून ब्रिटिशांना परतवून लावले.

अशाप्रकारे प्रज्ञावंत किंवा अतिप्रज्ञावंत किंवा कुशाग्र बुद्धिमत्ता असलेले विद्यार्थी आपल्या शाळेत, वर्गात असतात ते एकाच बाबतीत नाही तर सर्वच बाबतीत अग्रेसर असतात. अशा प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना ओळखणे व त्यांना मार्गदर्शन करणे ही शाळेची, शिक्षकांची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असलेली दिसून येते.

असे प्रज्ञावंत विद्यार्थी कोणते? कसे ओळखायचे? त्यांचे प्रकार व वैशिष्ट्ये कोणती ? प्रज्ञावंतासाठी शैक्षणिक उपक्रम कोणते ? शिक्षक व पालक यांनी काय करावे? त्यांना खऱ्या अर्थाने योग्य मार्गदर्शनाची गरज असते त्यांच्या समस्या, गरजा या सर्व सामान्यांहून वेगळ्या असतात त्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेऊन मार्गदर्शन केले तर विकासासाठी अधिक चालना मिळेल, प्रज्ञावंत ही देशाची बौद्धिक संपदा अधिक विकसित करुन त्यांचा समाजोपयोगी कार्यास व देशाच्या विकासासाठी जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्यासाठी प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची गरज आहे.

**२) प्रज्ञावंत म्हणजे काय? :**

प्रज्ञावंतांच्या विविध मानसतज्ज्ञांनी विविध व्याख्या केलेल्या आहेत.

**१) युनायटेड स्टेटसमधील मानसशास्त्रज्ञांच्यामते :**

''ज्यांचा बुद्ध्यांक १३७ व त्यापेक्षा जास्त आहे त्यांना प्रज्ञावंत म्हणता येईल.''

**२) पिलग्लर व बिश यांच्या मते :**

''विज्ञान, गणित, कला, सर्जनशील लेखन, संगीत, सामाजिक नेतृत्व अशा विविध क्षेत्रातील उच्च प्रतीची प्रज्ञा, तसेच सभोवतालची परिस्थिती हाताळण्यासाठी लागणारी उच्च प्रतीची सर्जनशीलता असलेली बालके म्हणजे प्रतिभाशाली बालके होय.''

**३) फिराने व कर्बी यांच्यामते :**

''समाजाच्या दृष्टीने मूल्यवान अशा कोणत्याही क्षेत्रात श्रेष्ठ प्रतीची पात्रता धारण करणाऱ्या कोणत्याही वयोगटातील व्यक्तींना प्रज्ञावंत असे म्हणता येईल. ''

**४) रेन्झुलीनच्या मते :**

''बौद्धिक पात्रता, हातातील कार्याविषयी श्रेष्ठ प्रतीची निष्ठा आणि उच्च सर्जनशीलता या तीन घटकांतील आंतरक्रियेचा परिपाक म्हणजे प्रतिभा होय.'' ज्या बालकांमध्ये ही सर्व गुण वैशिष्ट्ये आहेत किंवा जी मुले या गुणांचा विकास साधू शकतील व समाजोपयोगी क्षेत्रात त्यांचा वापर करु शकतील अशी बालके प्रतिभाशाली बालके होय. तसेच यांच्यामते, एखादी व्यक्ती अतिशय बुद्धिमान आहे परंतु निष्क्रिय आहे त्याच्या बुद्धीचा उपयोग समाजोपयोगी कामासाठी होत नसेल तर त्यास प्रज्ञावंत म्हणता येणार नाही.


**५) युनायटेड स्टेटसचे शिक्षण आयुक्त (१९८१) यांनी प्रज्ञावंतासाठी केलेली सुलभ व्याख्या :**

Gifted and talented are those who give guidance of high performance capability, in areas such as intellectual creative, artistic, leadership capability or specific academic field and who required service or activities not ordinarily provided by the school in order to fully develop such capanilities.

सर्वसाधारणपणे एकूण विद्यार्थ्यात शेकडा ३ ते ५ विद्यार्थी हे प्रज्ञावंत असतात की ज्यांचा बुद्धांक १३० च्या वर असतो. प्रज्ञावंतांच्या प्रज्ञेची वाढ कुटुंब, शाळा व समाज समाज यांच्या सामूहिक प्रयत्नानेच होत असते. मुले व मुली यांमध्ये प्रज्ञावंत समान प्रमाणात असतात.

**३) प्रज्ञावंताचे प्रकार व वैशिष्ट्ये :**

ज्यांचा बुद्ध्यांक १३० च्या वर असतो अशा प्रज्ञावंतांमध्ये ही वैशिष्ट्यपूर्ण विविधता आढळते त्यांची प्रज्ञा विशिष्ट क्षेत्रांमध्ये दिसून येते. तज्ज्ञांनी ३ प्रकार सांगितले आहेत.




**प्रज्ञावंताचे प्रकार व वैशिष्ट्ये :**

| | बौद्धिक दृष्ट्या प्रज्ञावंत | शालेय अभ्यासातील प्रज्ञावंत | सर्जनशील प्रज्ञावंत |
|---|---|---|---|
| १. | वयाच्या मानाने मोठी अवधान कक्षा व फार मोठी शब्द संपत्ती लाभलेली असते. | विशिष्ट क्षेत्रात अध्ययन विलक्षण गतीने असते. | चौकसबुद्धी व स्वतःच्या मनाप्रमाणे काम करण्याची प्रवृत्ती असते. |
| २. | नीतीमूल्ये जागरुकता, धर्म, राजकारण यांमध्ये रस असतो. | क्षेत्रात उच्च प्रतीचे ज्ञान संपादन करण्यासाठी भरपूर वेळ देण्याची व परिश्रम करण्याची तयारी असते. | एकट्याने काम करण्यास प्राधान्य देतात. |
| ३. | तत्त्वाचा, नियमांचा वापर, व्यापक सामान्यीकरण करण्याची पात्रता, साम्य व फरक शोधण्याची वृत्ती असते. | आपल्या विशेष क्षेत्रातील संबोध, पद्धती, मांडणी यांचे उच्च प्रतीचे आकलन त्यांच्या अंगी असतो. | कृतीशिलता व कल्पनाशक्ती असल्याने कामात विविध प्रयोग करुन पहाण्याची प्रवृत्ती असते. |
| ४ | चौकस व जिज्ञासू वृत्ती असते. | विशिष्ट अभ्यास विषयांची संबंधित कामासाठी खूपच मोठी अवधानकक्षा असते. | अनपेक्षित चतुर उत्तर देऊन थक्क करण्यात त्यांना आनंद वाटतो. |
| ५ | वाचनाचा वेग जास्त, वाचलेले पटकन आठवते व कार्यकारण संबंधाचे लवकर आकलन होते. | विशेष अभ्यास क्षेत्रातील संबंधाचा इतरत्र वापर करण्याची क्षमता असते. | साहसी वृत्ती |
| ६ | दुसऱ्या /तिसऱ्या वर्षीच स्वतःहून वाचायला शिकतात वाचन स्वतंत्र असून प्रौढांसाठीची पुस्तके वाचतात. | उदा. डॉ. अब्दुल कलाम अणुचाचणीतील योगदान, डॉ. होमी जहांगीर भाभा, बाबासाहेब पुरंदरे, इंदिरा गांधी, लोकमान्य टिळक | आव्हाने पेलण्याची तयारी |
| ७ | प्रौढांप्रमाणे स्वतःवर उच्च दंडक घालून घेतात. | | तीव्र विनोदबुद्धी |
| ८ | माहितीचे स्मरण, वयाच्या मानाने तीव्र विनोदबुद्धी, आव्हानात्मक अनुभवांना | | सौंदर्य टिपण्याची गुणग्राहकता असते. |

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

| | | | |
|---|---|---|---|
| | सामोरे जाण्याची वृत्ती असते. | | |
| ९ | अमूर्त विचारशक्तीत ते अग्रेसर असतात. | | सामाजिक बंधनाबाबत उदासीनता असते. |
| १० | उदा. ज्ञानेश्वर महाराज, बॅट्रॉड रसेल हे साहित्याचे नोबल पारितोषिकाचे मानकरी आहेत. त्यांनी तत्त्वज्ञान, गणित, धर्म, शिक्षण, समाजशास्त्र, नीतीशास्त्र, इतिहास, राजकारण अशा अनेक विषयांवर सकस व विपुल लेखन केले. | | उदा. सचिन तेंडुलकर लहानपणापासून क्रिकेटमध्ये प्रावीण्य परंतु अभ्यासातील प्रावीण्य साधारण, लता मंगेशकर गायनाची उपजतच देणगी, बालगंधर्व यांची विद्याभ्यासाकडे कमी प्रवृत्ती होती व मधुर आवाजाच्या देणगीमुळे त्यांचा गायनाकडे जास्त ओढा होता. |

विशिष्ट प्रज्ञेनुसार ढोबळपणे जरी वरील प्रकार पाडले असते तरी प्रज्ञावंत हे त्यांच्याकडच्या अलौकिकतेने त्यांची प्रज्ञा किंवा ते सामान्यापेक्षा वेगळे असल्याचे सिद्ध करतात. प्रज्ञावंत ओळखण्यासाठी काही वैशिष्ट्ये आहेत. त्यानुसार बाल्यावस्थेतच प्रज्ञावंत त्यांच्या वैशिष्ट्यानुसार ओळखता येतात व त्यांना योग्य मार्गदर्शन करता येते.

**४) प्रज्ञावंतांना ओळखण्याची वैशिष्ट्ये :**

१) एक किंवा अनेक प्रज्ञा त्यांच्यामध्ये असतात.

२) स्वयंप्रज्ञा उच्च प्रकारची असते, बऱ्याच वेळा अतिशय चांगल्या जगावेगळ्या कल्पना मांडतात व त्यांचा वापर करतात.

३) कठीण विषयाच्या अध्ययनातून त्यांना आनंद मिळतो.

४) अनेकविध संपर्क माध्यमांच्याद्वारा आत्माविष्कार करण्याची पात्रता व परिसरात घडणाऱ्या बदलांबाबत जागरुकता त्यांच्यात दिसते.

५) जन्मवेळी वजन जास्त असते.

६) मोठी अवधान कक्षा असते.

७) लवकर चालायला व बोलायला लागतात, चुणचुणीत असतात.

८) कोणीतीही गोष्ट लवकर शिकतात.

९) इतरांपेक्षा कमी वेळा पुनरावृत्ती करावी लागते.

१०) कृतीयुक्त कामावर भर देतात.

११) वाचायला लवकर शिकतात. सातत्यपूर्ण चांगल्या प्रतीचे व प्रगत वाचन असते.

१२) चौकसवृत्ती असल्याने सतत प्रश्न विचारत असतात. प्रत्येक गोष्टीचे कारण समजून घेण्याची जिज्ञासा असते.

१३) सर्वसामान्य मुलांना ज्या गोष्टी माहित नसतात अशा अनेक गोष्टींच्या माहितीचा साठा व ज्ञानसंग्रह त्यांचेकडे असतो.

१४) घर व शाळा येथे ते समायोजन योग्यप्रकारे साधतात.

१५) शिकलेल्या गोष्टींचा नवीन परिस्थितीत वापर करण्याची क्षमता असते.

१६) स्वतःच्या पात्रता, मर्यादा आणि समस्यांचे उचित विश्लेषण त्यांना करता येते.

१७) समस्येच्या कारणांचा शोध त्यांना घेता येतो कारण परस्पर संबंध ओळखण्याची, अर्थ विवेचन करण्याची क्षमता त्यांच्यात असते.

१८) अपयशाने लगेच खचून जात नाही.

१९) त्यांचे भावनिक संतुलन चांगल्या दर्जाचे असते.


२०) त्यांच्यामध्ये सर्जशीलता (नवनिर्मिती) असते.

वरील वैशिष्ट्ये सर्व प्रज्ञावंतांना सारख्याच प्रमाणात लागू होतात असे नाही. केवळ निरिक्षण सहवास व वर्तनातूनही दिसून येतात. बालकांशी व त्यांच्या पालकांशी केलेल्या सुसंवाद व मुलाखती ही प्रज्ञावंत ओळखण्यास मदत करतात. तसेच मानसशास्त्रातील कसोट्यांच्या माध्यमातूनही बुद्धिमत्ता सर्जनशीलता यांचे मापन करता येते.

**५) प्रज्ञावंतासाठी शैक्षणिक उपक्रम :**

सर्वसामान्य मुलांना ज्या गोष्टी माहित नसतात अशा अनेक गोष्टींच्या माहितीचा साठा ज्ञानसंग्रह प्रज्ञावंतांकडे असतो. सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणे अध्ययन केल्यास ते त्यात रमत नाहीत. त्यामुळेच इतर मुलांच्या खोड्या काढणे किंवा स्वतःच्याच काही दुसऱ्या कामात रमणे असे ते करतात. यासाठी शिक्षकांनी व शाळेने काही वेगळे उपक्रम घेणे गरजेचे ठरते. अन्यथा प्रज्ञावंतांच्या प्रज्ञा विकसनात अनेक अडथळे येतात. शाळेने उपलब्ध परिस्थिती विचारात घेऊन शिक्षकांच्या सहकार्याने खालीलपैकी काही उपक्रमांचा अवलंब केल्यास ही देशाची बौद्धिक संपत्ती योग्य कारणी लागेल.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*




**१) तात्पुरते वेगळे वर्ग :**

दिवसाचा काही वेळ या मुलांनी इतर मुलांबरोबर अभ्यास करायचा व काही वेळ वेगळ्या ठिकाणी आपल्या प्रज्ञेच्या क्षेत्रात काम करावयाचे यामुळे संगीत, विज्ञान, गणित, कला इ. क्षेत्रात प्रज्ञावाढीस प्रज्ञावंतांना मदत मिळेल.

**२) वरच्या वर्गात प्रवेश देणे :**

प्रज्ञावंतांची प्रज्ञा शाळा प्रवेशापूर्वी दिसून आल्यास ठरविलेल्या वयापेक्षा कमी वयातच मुलांना शाळेत प्रवेश घ्यावा. शाळेत प्रवेशानंतर प्रज्ञावंत दिसून आल्यास पुढच्या वर्गाऐवजी एक–दोन वर्ग सोडून त्यापुढच्या वर्गात प्रवेश घ्यावा म्हणजे पहिली नंतर तिसरी किंवा चौथीत प्रवेश घ्यावा. यामध्ये प्रज्ञावंत दोन वर्गाचा अभ्यासक्रम एकाच वर्गात पूर्ण करु शकतो.

**३) इयत्ता नसलेले वर्ग / शाळा :**

या संकल्पनेत इयत्ता तिसरी, चौथी, नववी असे व ठेवता केवळ अभ्यासक्रम असतो तो विद्यार्थ्यांनी आपल्या कुवतीनुसार पूर्ण करावयाचा असतो. अभ्यास पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व मदत कठीण संबोध समजून घेणे, संदर्भ साहित्य इत्यादी शाळेने क्रमाने अभ्यासक्रमानुसार उपलब्ध करुन घ्यायची असते यामुळे प्रज्ञावंत विद्यार्थी आपोआपच अभ्यासक्रम पूर्ण करीत पुढे–पुढे जातात. त्यांना आवडत्या विषयात प्राविण्य संपादण्याची संधी मिळते. इतर सामान्य विद्यार्थ्यांसाठी त्यांना थांबावे लागत नाही. विशिष्ट अभ्यासक्रम सामान्य विद्यार्थ्यांना एका वर्षात पूर्ण करता येत असेल तर प्रज्ञावंत तो सहा महिन्यात किंवा कमी कालावधीत पूर्ण करुन पुढे जाऊ शकतात. शिक्षकांची केवळ मार्गदर्शकाची भूमिका असते.

**४) प्रज्ञावंतासाठी वेगळ्या शाळा/वर्ग :**

जिल्ह्यातील किंवा शहरातील तालुक्यातील प्रज्ञावंत एकत्र करुन त्यांचेसाठी स्वतंत्र शाळा सुरु करता येतील. त्यांचेसाठी वेगळा अभ्यासक्रम ही ठेवता येईल. एकाच शाळेत एकाच वर्गातील विद्यार्थी संख्येत प्रज्ञावंत संख्येने एका तुकडीच्या संख्येएवढे असतील तर त्यांची स्वतंत्र तुकडी शाळेला करता येईल. त्यांचेसाठी प्रज्ञावंताचे बौद्धिक कुवतीस खाद्य पुरविणारी अध्यापन पद्धती, घटक, समस्या देता येतील. खास उपक्रम की ज्यामधून प्रज्ञावंतांची प्रज्ञा अधिक विकसित व्हायला मदत होईल. असे वेगळ्या शाळा किंवा वर्ग घेता येतील.

**५) खास अध्यापन :**

प्रज्ञावंतांच्या प्रज्ञेचा विचार करुन शिक्षकांना खास अध्यापन करता येईल. ग्रंथालयाचा वापर शास्त्रीय पद्धत व इतर तंत्रांची माहिती असल्यास स्वतंत्र अभ्यास आखणे व त्यानुसार अध्यापन करणे सोपे होते. तसेच विद्यार्थ्यांना जलद अध्यापन करुन अध्ययनास वेळ दिल्यास विद्यार्थी आवडीच्या विषयाचा अभ्यास करु शकतात त्यामुळे त्यांचा वेळ सत्कारणी लागतो.

शिक्षकांनी खास अध्यापन मार्गदर्शन करताना –

१) शिक्षकांनी वर्गातच सामान्य मुलांना विचारावयाच्या प्रश्नांपेक्षा प्रज्ञावंतांना वरच्या पातळीचे प्रश्न विचारावेत.

२) केवळ ज्ञान, आकलनाचे प्रश्न न विचारता त्यांना विश्लेषण, तर्काधिष्ठित, कार्यकारणभाव यावर आधारित असे विचार शक्तीस चालना देणारे व प्रज्ञेस खाद्य मिळणारे प्रश्न विचारावेत.

३) खास तज्ज्ञांची व्याख्याने खास प्रज्ञावंतांसाठीच आयोजित करावीत.

४) प्रज्ञावंतांना उच्च प्रतीचे अध्ययन साहित्य/संदर्भ अध्ययनासाठी उपलब्ध करुन द्यावे.

५) प्रज्ञावंतांना राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा यांना बसण्यास प्रोत्साहित करावे.

अशा परीक्षांच्या धर्तीवर प्रज्ञावंतांच्या प्रज्ञेनुसार प्रश्नपत्रिका काढून त्या सोडविण्यास देता येतील.

**६) शिक्षक व पालक यांनी प्रज्ञावंतांसाठी करावयाचे मार्गदर्शन :**

१) प्रज्ञावंत हे शारीरिक व मानसिकदृष्ट्या पुरेसे संतुलित असतात. सामान्यांपेक्षा थोडी वरचढ असतात. तरी देखील प्रज्ञावंत बऱ्याचदा आपली हुशारी दिसू नये यासाठी प्रयत्न करतात किंवा आपणास शिक्षक ओरडतील मुले हसतील, जास्त शहाणा आहे असे म्हणतील या भीतीने वर्गात बोलत नाहीत. त्यामुळे त्यांचे अभ्यासातील लक्ष उडते अशावेळी त्यांना शिक्षकांनी वर्गात बोलण्यास संधी देणे. पालकांनी त्यांचा होणारा कोंडमारा ओळखून शिक्षकांशी संपर्क साधावा व भीती दूर करण्यास मदत करावी त्याला मार्गदर्शन करावे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२) प्रज्ञावंतांना पुढील अभ्यासक्रम किंवा व्यवसाय निवडीसाठी सामान्यांपेक्षा मार्गदर्शनाची अधिक गरज भासते त्यासाठी त्यांच्या प्रज्ञेची जाणीव वेळीच होणे आवश्यक आहे त्याचबरोबर मर्यादांचीही जाणीव व्हावी म्हणून शिक्षकांनी व्यवसाय मार्गदर्शनाचे प्रशिक्षित समुपदेशक किंवा प्रत्यक्ष मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांशी संपर्क साधून समुपदेशक सेवा शाळेत किंवा वैयक्तिक पातळीवर उपलब्ध करुन द्यावी.

३) प्रज्ञावंत अपंग बालकांना तर भावनिक समायोजनासाठी मार्गदर्शनाची खूपच आवश्यकता असते. उच्च प्रतीची बौद्धिक पात्रता व अपंगत्वामुळे येणाऱ्या मर्यादा यामुळे त्यास वैफल्यातून सावरण्यास मार्गदर्शन उपयुक्त ठरते. अपंगत्वावर मात करुन प्रज्ञेच्या जोरावर हे प्रज्ञावंत जीवनात यशस्वी होतात. प्रज्ञावंतांना जीवनात यशस्वी होण्यास मार्गदर्शन मदत करते.

अशाप्रकारे प्रज्ञावंतांच्या समस्या, गरजा समजून येतात व त्या सोडविण्यासाठी मार्गदर्शनाची अत्यंत गरज असलेली दिसून येते. त्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेवून यांच्या विकासासाठी क्षेत्रे दाखविली जाते. तसेच प्रज्ञावंतांच्या प्रज्ञेस विकासासाठी अधिक चालना मिळण्यासाठी मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. ती आजच्या काळाची गरज निर्माण झाली आहे. त्यातून प्रज्ञावंत ही देशाची बौद्धिक संपदा असल्यामुळे ही बौद्धिक संपदा अधिक विकसित करुन त्याचा समाजोपयोगी कार्यास व देशाच्या विकासासाठी जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्यासाठी मार्गदर्शनाची अत्यंत गरज आहे किंबहुना हे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरते.

**७) संदर्भ ग्रंथ :**

*Education in Psychology and guidance S. B. Kogekar.*
*Guidance in Indian Education – S. K. Kochhar.*
*चव्हाण किशोर (२००७) विकास व अध्ययनाचे मानसशास्त्र, नाशिक, इनसाईट प्रकाशन.*
*बरकले रामदास, पिचड नलिनी (२०१०) शैक्षणिक मानसशास्त्र, नाशिक : इनसाईट प्रकाशन.*
*पंडित र. वि. कुलकर्णी अ. वि. (१९९९) सामान्य मानसशास्त्र, नागपूर : पिंपळापुरे पब्लिशर्स.*
*पलसाने म. न. (२००६), मानसशास्त्र, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.*
*शिक्षण संक्रमण, (मे – जून २००२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.*